**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## उन्हाळी २०२० परीक्षा संचालन सुधारित कार्यपद्धतीबाबत विद्यार्थ्यांना सूचना

अमरावती –

सध्या जगभर सुरु असलेल्या कोव्हिड १९ चा प्रादुर्भाव व त्या अनुषंगाने उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा वेगळ्या पद्धतीने आयोजित करण्यात येणार आहे. या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालय, युजीसी, एआयसीटीई, कुलपती, राज्य सरकारद्वारा प्राप्त निर्देशानुसार तसेच सध्या राज्यात लागू असलेल्या आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या तरतुदींना अनुसरुन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उन्हाळी २०२० या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे ऑनलाईन पद्धतीने नियोजन केले आहे.

मार्च २०२० पासून लागू करण्यात आलेली टाळेबंदी, त्यामुळे तयार झालेले अनिश्चिततेचे वातावरण व त्यानुषांगे विद्यार्थ्यांना अनुभवावा लागणारा ताण आदी बाबी लक्षात घेता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे उन्हाळी २०२० मध्ये प्रवेशित व माजी विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष/अंतिम सत्र व याच विद्यार्थ्यांचे इतर सत्रांचे अनुशेष आणि अंतिम वर्ष/सत्राचे बहिःशाल विद्यार्थ्यांच्या परीक्षेची योजना आदींबाबत नियोजन करण्यात आले आहे. आदींबाबतची सविस्तर कार्यपद्धती सर्व संलग्नित महाविद्यालयांना पाठविण्यात आलेली आहे.

सदर कार्यपद्धतीनुसार परीक्षा ऑनलाईन संपन्न होणार असून सविस्तर कार्यपद्धती सर्व संलग्नित महाविद्यालयांना पाठविण्यात आलेली आहे. कार्यपद्धती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थी, पालक, अभ्यागत व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, शैक्षणिक विभागप्रमुख यांनी नोंद घेण्याचे तसेच परीक्षा संचालन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे. विद्यार्थ्यांना सदर परीक्षेसंदर्भात काही अडचण असल्यास त्यांनी ९३५६८००६७३ या व्हाट्‌सॲप क्रमांकावर कळवाव्यात.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १४/०९/२०२०.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

प्र. जनसंपर्क अधिकारी